नवभारत, मुंबई 1 फरवरी 2009



पुणे. औंध स्थित राजवैभव प्रतिष्ठान व्दारा दिए जानेवाला श्रीमंत बालासाहब पंतप्रतिनिधी कलाभूषण पुरस्कार वरिष्ठ समाजसेवक अण्णा हजारे को पुणे विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. नरेन्द्र जाधव के हाथों हाल ही में प्रदान किया गया.

६ | पुणे, सोमवार, दि. २ फेब्रुवारी २००९



महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजनेच्या २६ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित स्पर्धांचे पारितोषिक वितरण रविवारी गणेश कला क्रीडा मंच येथे पार पडले. याप्रसंगी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# भारताची धोरणे मंदीचा सामना करण्यास समर्थ : डॉ. जाधव

**पुणे** (प्रतिनिधी) : रिझर्व बँक आणि केंद्र सरकार यांची आर्थिक धोरणे मंदीच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेला वाचविण्यासाठी समर्थ आहेत, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

पुणे पीपल्स सहकारी बँकेच्या ५७ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. बँकेचे अध्यक्ष पन्नालाल लुणावत, उपाध्यक्ष जनार्दन रणदिवे, 'म्हाडा'चे अध्यक्ष अंकुश काकडे, सहकार खात्याचे अप्पर निबंधक मनोहर त्रिभुवन, ॲड. सुभाष मोहिते या वेळी उपस्थित होते.

अमेरिकेत सुरू झालेल्या मंदीची झळ जगभर पसरली आहे. फेडरल रिझर्व बँकेच्या नियंत्रणाचा अभाव, लायकी नसताना वाटलेली गृहकर्जे, खासगी क्षेत्राला प्रोत्साहन आणि चंगळवाद यांची परिणती म्हणून अमेरिकेत सध्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, भारतात रिझर्व बँकेची धोरणे आणि केंद्र सरकारच्या दक्ष भूमिकेमुळे बँका बुडण्याची भीती नसल्याचे डॉ. जाधव यांनी नमूद केले.

प्रास्ताविकात लुणावत म्हणाले, बँकेच्या संचालक मंडळाची एकवाक्यता, संस्थेच्या हितास प्राधान्य, ग्राहकाभिमुख योजना आणि संघभावना ही बँकेच्या यशाची चतु:सूत्री आहे. रिझर्व बँकेच्या लेखापरीक्षणात पीपल्स बँकेने प्रथम श्रेणी मिळविली आहे. बँकेचा व्यवसाय ५५० कोटींचा असून, एक हजार कोटी रुपये व्यवसायाचे उद्दिष्ट आहे. या प्रसंगी मुंबईतील हल्ल्यातील चार जखमींना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले. विशेष प्राविण्यासाठी शिरीष मोहिते, सोपान कांचन, शेटे, डॉ. बावस्कर आणि पोलिस पुरस्कारप्राप्त अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन मंगेश वाघमारे यांनी, विजयकांत कोठारी यांनी आभार मानले.

पुढारी 1/2/9

# 'ध्येयपूर्तीकरिता झपाटून काम केले पाहिजे'

पुणे, दि.१ (प्रतिनिधी) - जीवनात यशस्वी व्हायचे असेल, तर जे क्षेत्र आपण निवडाल, त्यात ध्येयपूर्तीकरिता दर्जेदार काम केले पाहिजे, असे मत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

पुणे महापालिकेच्या नागरवस्ती विकास योजनेच्या २६ व्या वर्धापनदिनानिमित्त बालविकास केंद्रातून झालेल्या समूहनृत्य, दांडिया, लेझिम स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी समूहनृत्य, दांडिया, लेझिम स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्षा अश्विनी कदम, अशोक कळमळकर, शंकरराव बेलदरे-पाटील, नागर विकास वस्ती विकास विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

**दांडिया स्पर्धा :** प्रथम क्रमांक (पर्वती झोन) नीता पेठे - रामनगर, रामटेकडी हडपसर, **प्रथम क्रमांक** (येरवडा झोन) आरती कदम - वडारवाडी, **द्वितीय क्रमांक** (पर्वती झोन) सुनीता क्षीरसागर - जाधवनगर, वडगाव बुद्रुक, **द्वितीय क्रमांक** (येरवडा झोन) पंचशिला माने - नागपूरचाळ, येरवडा, **तृतीय क्रमांक** (पर्वती झोन) शुभांगी जाधव विकासनगर- घोरपडी गाव, **तृतीय क्रमांक** (येरवडा झोन) सरस्वती गवस - सुतारवाडी, **उत्तेजनार्थ क्रमांक** (पर्वती झोन) १) सुचित्रा पानसरे - काळेपडळ, हडपसर, २) शुभांगी ढोले - ढोले मळा, गुलटेकडी, ३) क्रांती जगताप - लक्ष्मीनगर, पर्वती, **उत्तेजनार्थ क्रमांक** (येरवडा झोन), १) सुरेखा अडागळे - पाटील इस्टेट, २) सविता देवकर - लक्ष्मीनगर, येरवडा, ३) सोनम खोंड - औंध, **समूह नृत्य स्पर्धा : प्रथम क्रमांक** (पर्वती झोन) सौ. संगीता सुकाळे - ४९०, नारायण पेठ, **प्रथम क्रमांक** (येरवडा झोन) सविता देवकर - लक्ष्मीनगर, येरवडा, **द्वितीय क्रमांक** (पर्वती झोन) सौ. सरिता कांबळे - प्रेमनगर, मार्केटयार्ड, **द्वितीय क्रमांक** (येरवडा झोन) आरती कदम - वडारवाडी, **तृतीय क्रमांक** (पर्वती झोन) अरुणा शिंदे - कांतिनी अपार्ट, कोंढवा बुद्रुक, **तृतीय क्रमांक** (येरवडा झोन) सायली शेळके - वैद्य वसाहत.

**उत्तेजनार्थ क्रमांक** (पर्वती झोन) १) शबाना शेख - इंदिरा नगर, गुलटेकडी, २) सुप्रिया भंडारे - लक्ष्मीनगर, सहकारनगर, ३) सविता तोडकर - सुपर इंदिरानगर बिबवेवाडी, ४) प्रिया पडवळ - साखळीपीर तालीम, नाना पेठ, **उत्तेजनार्थ क्रमांक** (येरवडा झोन) १) सरिता अंबाड - गोसावी वस्ती, २) विजया गायकवाड - बोपोडी, ३) सोनल केदारी - बोपोडी, ४) कल्पना जोगदंड - भीमनगर.

चिंतन इमेज मेकर्स

पुण्यनगरी 2/2/9